**MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED**
(A Government of Maharashtra Undertaking)
**Dadasaheb Phalke Chitranagari**
Filmcity, Mumbai
https://filmcitymumbai.org

**दादासाहेब फाळके चित्रनगरीत "पंचप्रण शपथ" उपक्रम संपन्न**

........................

दाफाचि 09: स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त "माझी माती माझा देश" या अभियानांतर्गत "पंचप्रण शपथ" उपक्रम दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या अधिकारी-कर्मचारी यांच्या उपस्थितीत बैठक हॉल येथे संपन्न झाला.

महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली यावेळी उपस्थित सर्वांनी "आम्ही शपथ घेतो की, भारतास २०४७ पर्यंत आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न साकार करू, गुलामीची मानसिकता मूळापासून नष्ट करू, देशाच्या समृद्ध वारशाचा गौरव करू, भारताची एकात्मता बलशाली करू आणि देशाचे संरक्षण करणाऱ्यांप्रति सन्मान बाळगू, देशाचे नागरिक म्हणून सर्व कर्तव्यांचे पालन करू", ही पंचप्रण शपथ ग्रहण केली.